## रे.दि. मु. नं. ५०/२०१२ मधील नि.क्र.२१७ खालील आदेश
## (अशोक बुवासाहेब नायकवडी वगैरे वि. रुपाली विजयकुमार रासकर वगैरे)
**CNR No.- MHST16-000253-2012**

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी कैफीयत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळावी, याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द वाद मिळकतीपैकी गट क्र.३०७९ या मिळकतीचे दिनांक १०.०७.२००९ व २०.११.२०२० रोजीचे खरेदीपत्र वादीचे हिस्स्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरकामी प्रतिवादी यांनी हजर होवुन देखील त्यांची कैफियत मुदतीत कैफीयत दाखल करु शकलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द 'विनाकैफीयत' चा आदेश दि.२०.१०.२०२२ रोजी नि.१ वर पारीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे विना कैफीयत सुनावणीसाठी प्रकरण ठेवलेले आहे. त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांना दाव्यातील वाद विषयासबंधीची माहिती व कागदपत्रे योग्य त्या मुदतीत उपलब्ध न झाल्याने त्यांना त्यांची कैफियत दाखल करता आली नाही. सदरचा विलंब हा जाणुनबुजुन केलेला नाही. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर न्यायाच्या दृष्टीकोनातुन होणे आवश्यक आहे. म्हणून प्रतिवादीस कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. वादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांचेविरुद्ध दिनांक २०.१०.२०२२ रोजी 'विनाकैफीयत' चा आदेश झालेला आहे. कैफियत दाखल करण्यास का उशिर झाला याचे योग्य व संयुक्तीक कारण अर्जात नमुद नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

३. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तिवाद ऐकले. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हा जाहीर ठराव होवून मिळण्यासाठी दाखल

केला आहे. प्रतिवादी यांना सदर दाव्याचे समन्सची बजावणी नि.१८६ प्रमाणे दि. २५.०६.२०२२ रोजी होवूनही त्यांनी मुदतीत कैफीयत दाखल केली नाही. व सदरचा अर्ज दिनांक २४.०८.२०२३ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यांना कैफीयत दाखल करण्यास प्रतिवादींना सुमारे १ वर्षे २ महीन्यांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक वाटत नसले तरी, दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता, तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार प्रतिवादीस सदर दाव्यात त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे योग्य होणार आहे. प्रतिवादीने सदरचा अर्ज उशीराने सादर केलेला असल्याने व त्यामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडल्यामुळे त्याचेविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश हा त्याच्यावर खर्च लादुन रद्द करणे योग्य होईल. करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.७ व ८ विरुद्ध झालेला विनाकैफीयत आदेश त्यांच्यावर खर्च रक्कम रुपये ६००/– (रक्कम रुपये सहाशे फक्त) लादून रद्द करण्यात येत आहे.

३. खर्चाची रक्कम वादींना अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र.७ व ९ यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

CHHAYA VIKRAM SHIRSAT
Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2023.10.21 16:54:08 +0530

ठिकाण – वाई. (सी. व्ही. शिरसाट)

दिनांक – ११.१०.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.